# नाशिक महानगरपालिका,नाशिक
# समाजकल्याण विभाग
# कोटेशन फॉर्म दरपत्रक २०२४

**कामाचे नाव :-** नाशिक महानगरपालिके तर्फे दि. ०९ एप्रिल २०२४ चैत्र शु.१ गुढीपाडव्या निमित्त दि. ०६.०४.२०२४ रोजी होणाऱ्या महावादन कार्यक्रमासाठी वादक व वादन साहित्य वाहतूकीसाठी भाडेतत्वावर सेवा पुरवणेबाबत...

कोटेशन सादर करण्याची अंतिम मुदत :- दि. १८/०३/२०२४ रोजी दुपारी २:०० वाजेपर्यंत
कोटेशनधारकाचे नाव व पत्ता :- ------------------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------------------------------------------
संपर्क क्रमांक (मोबाईल क्रमांक/भ्रमणध्वनी क्रमांक) :------------------------------------

नाशिक महानगरपालिके तर्फे दि. ०९ एप्रिल २०२४ चैत्र शु.१ गुढीपाडव्या निमित्त दि. ०६.०४.२०२४ रोजी होणाऱ्या महावादन कार्यक्रमासाठी वादक व वादन साहित्य वाहतूकीसाठी सेवा भाडेतत्वावर पुरवणेकरीता खालील प्रमाणे दर सादर करीत आहे.

| अ.क्र. | कामाचा तपशिल | अंदाजित एकुण वादक व्यक्ती व वादन साहित्य संख्या (प्रत्येकी) | वाहतूकीचा एकुण खर्च रक्कम रु. |
|---|---|---|---|
| १. | **म्हसरुळ, डी.जी.पी.नगर, अंबड, सातपूर, पाथर्डी गांव, नाशिकरोड, इंदिरानगर, आर.टी.ओ. कॉर्नर, गंगापुर गांव, दिंडोरी, सटाणा, ओझर, पिंपळगांव, लासलगांव, पालखेड, सिन्नर ते गंगाघाट पाडवा पटांगण पर्यंत** वादक व वादन साहित्य वाहतूकीसाठी वाहतूक सेवा पुरवणेबाबत **(आणणे व परत त्याच जागी सोडणे.)** | १५०० | |

सदर कोटेशनसोबत असलेल्या सर्व अटी- शर्ती मी वाचले असुन मला त्या मान्य आहेत . सदरअटी शर्ती प्रमाणे सदर कोटेशनमध्ये नमुद केलेल्या दराने उक्त साहित्य व सेवेचा पुरवठा करण्यास मी/आम्ही तयार आहे. त्यासाठी या कोटेशनवर स्वाक्षरी करीत आहे .

दिनांक:-
ठिकाण:-

निविदाधारकाची सही व शिक्का

**नाशिक महानगरपालिका, नाशिक**
**कामगार कल्याण विभाग**
**कोटेशन नोटीस**

**कामाचे नांव :-** नाशिक महानगरपालिके तर्फे दि. ०९ एप्रिल २०२४ चैत्र शु.१ गुढीपाडव्या निमित्त दि. ०६.०४.२०२४ रोजी होणाऱ्या महावादन कार्यक्रमासाठी वादक व वादन साहित्य वाहतूकीसाठी भाडेतत्वावर सेवा पुरवणेबाबत.

नाशिक महानगरपालिके तर्फे दि. ०९ एप्रिल २०२४ चैत्र शु.१ गुढीपाडव्या निमित्त दि. ०६.०४.२०२४ रोजी होणाऱ्या महावादन कार्यक्रमासाठी वादक व वादन साहित्य वाहतूक सेवा अधिकृत वाहतुकदार यांचेकडुन भाडेतत्वावर पुरवणेकरीता खालील प्रमाणे खालील प्रमाणे दर मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचा तपशिल | अंदाजित एकुण वादक व्यक्ती व वादन साहित्य संख्या (प्रत्येकी) |
|---|---|---|
| १. | **म्हसरुळ, डी.जी.पी.नगर, अंबड, सातपूर, पाथर्डी गांव, नाशिकरोड, इंदिरानगर, आर.टी.ओ. कॉर्नर, गंगापुर गांव, दिंडोरी, सटाणा, ओझर, पिंपळगांव, लासलगांव, पालखेड, सिन्नर ते गंगाघाट पाडवा पटांगण पर्यंत** वादक व वादन साहित्य वाहतूकीसाठी वाहतूक सेवा पुरवणेबाबत (**आणणे व परत त्याच जागी सोडणे.**) | १५०० |

**अटीशर्ती**

१. वरील कामाचे कोटेशन पत्रक अटीशर्ती सह www.nmc.gov.in या संकेत स्थळावर दिनांक १४/०३/२०२४ ते दिनांक १८/०३/२०२४ रोजी दुपारी १२:०० वाजेपावेतो उपलब्ध आहे.
२. कोटेशन पाकीट सादर करणेची अंतिम तारीख दि. १८/०३/२०२४ रोजी दुपारी २:०० वाजेपर्यंत राहील. मुदतीनंतर प्राप्त होणारी कोटेशन पाकीटे स्विकारली जाणार नाही.
३. कोटेशन पाकीट समाजकल्याण विभाग राजीव गांधी भवन शरणपुर रोड नाशिक येथे स्विकारण्यात येतील.
४. वरील साहित्य व सेवेचा पुरवठा करणेकरीता कोणताही पॅकींग, वाहतूक या सारखा अतिरिक्त खर्च देय राहणार नाही.
५. सदरचे दरपत्रक हे सर्व करासह अनुषंगीक खर्चासह दर नमुद करायचे आहे. कोणत्याही कराची जबाबदारी नाशिक महानगरपालिकेवर राहणार नाही.
६. कोटेशन धारकाने दोन लिफाफे देणे आवश्यक आहे. १) तांत्रिक लिफाफा या लिफाफ्यात पॅनकार्ड, शॉप ॲक्ट लायसन्स, GST नोंदणी प्रमाणपत्र, वाहतूक सेवा पुरवणेबाबत परवाना/कागदपत्रे आवश्यक आहे. त्या शिवाय कोटेशनचा विचार केला जाणार नाही. तांत्रिक लिफाफा पात्र असल्यावरच वित्तिय लिफाफा उघडण्यात येईल.
७. वित्तिय लिफाफा---- दर पत्रक आवश्यक
८. निवडण्यात आलेल्या कोटेशन धारकास र.रु. १५,०००/- (प्राकलनाच्या एकूण रक्कमेच्या) ५% सुरक्षा अनामत भरावी लागेल.
९. कोटेशन स्विकारणे / नाकारण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांना राहील.

Sd/-
**उप आयुक्त (समाज कल्याण)**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

# नाशिक महानगरपालिका , नाशिक

## समाजकल्याण विभाग

## सर्व साधारण अटी शर्ती (ई कोटेशन)

**कामाचे नाव :-** नाशिक महानगरपालिके तर्फे दिनांक ०९ एप्रिल २०२४ चैत्र शु.१ गुढीपाडव्या निमित्त दि. ०६.०४.२०२४ रोजी होणाऱ्या महावादन कार्यक्रमासाठी वादक व वादन साहित्य वाहतूकीसाठी भाडेतत्वावर सेवा पुरवणेबाबत.

### सर्व साधारण अटी -शर्ती

१) कोटेशन सोबतची कोटेशनधारकाची कोणतीही अट मान्य करता येणार नाही. सशर्त कोटेशन तात्काळ रद्द करण्यात येईल .

२) कोटेशन नोटिस मध्ये नमुद कामाचे स्वरुप हे अंदाजे असुन त्यामध्ये कामाचे अनुषंगाने कमी जास्त होण्याची शक्यता आहे. अंदाजित संख्येपेक्षा अधिक वाहने व सेवा आवश्यक असल्यास त्याप्रमाणे त्याच दराने पुरवठा करणे बंधनकारक राहील तसेच अंदाजित संख्येपेक्षा कमी वाहने व सेवा आवश्यक असल्यास तेवढयाच प्रमाणात देयक अदा करण्यात येईल.

३) दिलेल्या मुदतीमध्ये वेळेवर संपुर्ण काम करणे / सेवा पुरविणे आवश्यक आहे. कोटेशनमधील कामानुसार पुरेश्या प्रमाणात सुस्थितीतील नोंदणीकृत वाहने पुरवणे आवश्यक राहील.

४) ज्यांचे कोटेशन दर मंजुर होईल त्या कोटेशनधारकास महानगरपालिकेचे लाभात र. रु. ५२०/- चे जनरल स्टँपपेपरवर रितसर करारनामा करुन द्यावा लागेल. तसेच एक सक्षम जामीनदार द्यावा लागेल.

५) जी.एस.टी करासह व अनुषंगीक खर्चासह कोटेशन दर नमुद करावयाचे आहे. कोणत्याही टॅक्सची जबाबदारी महानगरपालिकेवर राहणार नाही .

६) मुदतीत काम न केल्यास / सेवा न पुरविल्यास/ योग्य दर्जाचा व पुरेश्या प्रमाणात वाहनांचा पुरवठा न केल्यास महानगरपालिकेचे झालेले नुकसान विचारात घेऊन दंड आकारणी करण्यात येईल व सदरची रक्कम कोटेशनधारकाकडुन वसुल करण्यात येईल. वाहतूकीसाठी सुस्थितीतील वाहने पुरविणे आवश्यक राहील.

७) सदरचे मंजुर दराने कराराचे मुदतीपर्यंत वेळोवेळी गरजेनुसार कामकरणे/सेवा पुरविणे बंधनकारक राहील.

८) मुदतीत काम न झाल्यास/ /सेवा न पुरविल्यास /मुदतीत काम पुर्ण न केल्यास,सदरचे काम कोटेशनधारकाचे जबाबदारीवर इतर ठिकाणाहुन करुन घेण्यात येईल आणि त्या कामी महानगरपालिकेस मंजुर दरापेक्षा जास्त खर्च आल्यास तो कोटेशनधारकाकडुन वसुल करण्यात येईल .

९) मंजुरीनुसार काम न झाल्यास / सेवा न पुरविल्यास,काम/ सेवा नाकारण्यात येईल व त्याबाबतचा महानगरपालिकेचा निर्णय अंतिम राहील . कोणत्याही कारणामुळे कार्यक्रम रद्द झाल्यास कोणतीही भरपाई मिळणार नाही.

१०) कोणतेही काम मंजुर केलेल्या दराने कोटेशनधारकाकडुन करण्याची महानगरपालिकेवर सक्ती नाही. याबाबत कोटेशनधारकास नुकसानभरपाई मागता येणार नाही.

११) अटी /शर्तीमधील एखाद्या शर्तीबाबत काही सवलत देणे अथवा आवश्यक अशा काही जादा अटी घालण्याबाबत महानगरपालिकेस अधिकार राहील.

१२) कोटेशन दर मंजुर झालेनंतर सदरच्या कामाच्या दरात/सेवेच्या दरात काही वाढ झाल्यास वाढलेल्या दराप्रमाणे कोटेशनधारकास जादा पैसे मिळणार नाही . प्राप्त कोटेशनमधील सर्व सेवांचे दर विचारात घेऊन सर्वाधिक कमी एकुण रक्कम असणाऱ्या (L१) एकाच पुरवठादाराची निवड करण्यात येईल.

१३) अटिशर्तीचा भंग केल्यास त्यांचे बिलातुन रक्कम जप्त करण्यात येईल.

१४) काही अपरिहार्य कारणास्तव देयके अदा करणेस उशिर झाल्यास त्यावर व्याज अनुज्ञेय राहणार नाही.

१५) GST नोंदणी प्रमाणपत्र शॉप ॲक्ट लायसन्स्, पॅन कार्ड, इ. कागद पत्रे स्व् साक्षंकित करुन कोटेशन सोबत जोडणे आवश्य्क आहे. त्याशिवाय कोटेशन विचारात घेतले जाणार नाही.

१६) कार्यक्रमाच्या सविस्तर तपशिलासाठी समाजकल्याण विभागात संपर्क साधावा.

Sd/-
उप आयुक्त (समाजकल्याण)
नाशिक महानगरपालिका नाशिक

सदरचे अटि शर्ती मी वाचल्या असुन सदरच्या अटी शर्ती मान्य व कबुल असुन त्याप्रमाने सेवा पुरविण्यास / काम करण्यास मी तयार आहे. त्यासाठी स्वाक्षरी करत आहे.

निविदाधारकाची सही व शिक्का